सोमवार
दि. ११ जुलै २०२२
मुल्य २ /- रुपये
पृष्ठ ४
वर्ष ५ वे अंक २८

RNI. MAHMAR/2018/77866
मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com
संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

# आरोपीने चक्क पोलिसांचीच गाडी पळविली

## वरोरा पोलीस स्टेशन येथील प्रकार



**वरोरा / प्रतिनिधी**
दारूच्या नशेत गोंधळ घालणाऱ्या एका आरोपीला वरोरा पोलिसांनी पकडून आणले, त्याच्यावर १८५ अंतर्गत कारवाई करून अति मद्य सेवन केल्याने त्याला काही काळ बसवून ठेवण्याचा निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला . पण माझी गाडी परत द्या नाही तर तुमची गाडी द्या, असे म्हणत त्याने चांगलाच गोंधळ माजविला होता. पोलिसांची नजरचुकवीत पोलीस स्थानकात उभ्या असणाऱ्या ११२ गाडीचा सेल्फ मारून आरोपी फरार झाला ही घटना शनिवारी रात्री वरोरा शहरात घडल्याने एकच खळबळ उडाली आहे.

वरोरा शहरापासून चार किलोमीटर अंतरावर असलेल्या मजरा या गावी एक इसम दारूचा नशेत गोंधळ घालत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तातडीने मजरा गाव गाठले आणि त्या ठिकाणाहून राकेश नामे या आरोपीला पोलीस स्टेशनमध्ये आणले. त्याच्यावर १८५ कलमान्वये कारवाई देखील करण्यात आली. मात्र, आरोपी लघुशंकेसाठी बाहेर जातो ही सबब सांगून पोलीस स्टेशनच्या बाहेर पडला आणि त्या ठिकाणी उभ्या असलेल्या पोलिसांच्या गाडीला चाबी लागली असल्याचे पाहून ती सुरू केली, आणि त्याने पोलिसांच्याच गाडीने चक्क पळ काढला. त्याठिकाणी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी आरोपीचा पाठलाग करणे सुरू केले.

तोपर्यंत आरोपी चंद्रपूर नागपूर महामार्गावरील येसा या गावापर्यंत पोहोचला होता. पोलीस आपला पाठलाग करीत आहे, ही बाब आरोपीच्या लक्षात येताच त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि गाडी दुभाजकावर आदळली यावर ठाणेदार दीपक खोब्रागडे यांची प्रतिक्रिया घेतल्यास दारूच्या नशेत आरोपीने कृत्य केले असून कुठलीही कारवाई केली नसल्याची माहिती त्यांनी दिली .

# पुलात अडकून चिमुकलीचा मृत्यू

## विठ्ठलवाडा येथील दुर्दैवी घटना

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
३ वर्षीय चिमुकलीचा पुलाखाली अडकून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना (दि. १०जुलै) रविवारला घडली. गोंडपिंपरी तालुक्यातील विठ्ठलवाडा येथील ही घटना आहे. मृतक चिमुकलीचे नाव सानू मंगेश चुनारकर वय ३ वर्ष असून ती मूल तालुक्यातील चिमडा येथील रहिवाशी होती.

गोंडपिपरी तालुक्यातील विठ्ठलवाडा येथे नातेवाइकांकडे भेटायला तीन दिवसांपूर्वी ती आईवडीलांसोबत आली होती . तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू असल्याने ती आई सोबत विठ्ठलवाडा येथे नातेवाइकाकडे थांबली. मुसळधार पावसाने कहर माजवला आहे. रविवारला सकाळी ९ वाजताच्या सुमारास घरासमोरील नालीत पाय घसरून पडली. नाली तुडुंब भरून वाहत असल्याने पाण्याच्या प्रवाहाबरोबर नालीलगत असलेल्या पुलात जाऊन अडकली. घरच्यांनी आरडाओरड करताच तिला वाचविण्यासाठी दोन युवक नालीत उतरले आणि तिला पुलातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र ती पाण्याच्या प्रवाहात वाहुन गेली आणि पुलाखाली अडकली . दहा ते पंधरा मिनिटांचा वेळ निघून गेला मात्र ती चिमुकली पुलाच्या बाहेर न पडल्याने घरच्यांची धाकधूक वाढली. पुलात बाबूं टाकुन पळताळणी करताच ती पाण्याच्या प्रवाहाबरोबर पूलाच्या बाहेर निघाली. मात्र बराच वेळ पुलाखालील पाण्यात अडकून राहील्याने बेशुद्ध पडली. लागलीच गावातील एका ऑटोने तिला ग्रामीण रुग्णालय गोंडपिपरी येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. चिमुकलीच्या दुर्दैवी मृत्यूने संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

# शेतकऱ्यांच्या डोळ्यातूनही बरसल्या धारा

## बेंबळा प्रकल्पाच्या चुकीने शेतीचे झाले शेततळे





**गजानन देवाळकर / मारेगाव**
तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात कायमस्वरूपी सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या बेंबळा प्रकल्पाचे सदोष कामामुळे शेतीपिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची मार्डी या गावी सभा आयोजित करण्यात आली होती. सभेच्या अध्यक्षस्थानी मारेगाव तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष अविनाश लांबट होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसभापती संजय आवारी मारेगाव तालुका कृषी अधिकारी सुनील निकाळजे, सरपंच रविराज चंदनखेडे, मार्डीचे माजी सरपंच भास्कर धानफुले उपसरपंच सुरेश लांडे , अभिजित मांडेकर, सरपंच प्रवीण नान्ने, राहुल आत्राम, रामचंद्र जवादे,पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सुमित हेपट प्रामुख्याने उपस्थित होते.

गेल्या चार दिवसा पासून सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशातच कुंभा,मार्डी परिसरातील बेंबळा प्रकल्पाचे कालवे फुटून शेतीपिकाचे नुकसान झाले आहे.सदोष कामामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी या प्रमुख मागणी साठी ही सभा मार्डी येथील हनुमान मंदिराच्या सभागृहात पार पडली. यावेळी बेंबळा प्रकल्पग्रस्त शेतकरी हक्क संघर्ष समिती गठीत करण्यात आली. नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना पुढील हंगाम कसा करावा याबाबतचे मार्गदर्शन कृषी अधिकारी सुनील निकाळजे यांनी केले. सूत्रसंचालन भास्कर राऊत यांनी केले, यशस्वीतेसाठी दिलीप खेकारे, सुमित जुनगरी, सतीश ताजने, वसंत ताजने, साईनाथ बावणे, प्रदीप डाहुले, यासह सरपंच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# प्रवासी घेऊन जाणारा ट्रक गेला पुरात वाहून

- तीन मृतदेह मिळाले, ओळख पटविण्यात प्रशासनाला यश
- वाहन चालक आणि क्लिनर अद्यापही बेपत्ता



**गडचिरोली / प्रतिनिधी**
९ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास आलापल्ली ते भामरागड या राष्ट्रीय महामार्गावरील पेरमिली गावालगत असलेल्या नाल्यात प्रवासी घेऊन जाणारा ट्रक पुरात वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली. प्रशासनाने १० जुलै रोजी पहाटेपासून शोध मोहीम राबवून तीन मृतदेह बाहेर काढले असून त्या तिघांची ओळख पाठविण्यात प्रशासनाला यश मिळाले आहे.सीताराम बिच्चु तलांडे रा.कासमपल्ली, सम्मी सीताराम तलांडे रा.कासमपल्ली आणि पुष्पा नामदेव गावडे मोकेला असे मृतकांचे नावे आहेत.

सीताराम बिच्चु तलांडे,सम्मी सीताराम तलांडे आणि पुष्पा नामदेव गावडे असे तीन प्रवासी कासमपल्ली फाट्यावरून मोकेला येथे पुष्पा गावडे हिच्या वडिलांच्या तेरावी च्या कार्यक्रमाला जात होते.अशी प्राथमिक प्राथमिक माहिती आहे.ट्रक मध्ये चालक,क्लिनर आणि तीन प्रवासी होते.पुरात वाहून गेल्यावर पहाटेच्या सुमारास सदर ट्रक नाल्यातील एका झाडाला अडकलेल्या स्थितीत आढळून आले. अहेरीचे तहसीलदार ओंकार ओतारी आपल्या चमुसोबत पहाटेच घटनास्थळी दाखल झाले. रात्रीपासून या परिसरात मुसळधार पाऊस सुरू असल्याने पाण्याची पातळी वाढली होती.अश्या परिस्थितीतही एस डी आर एफ चे प्रमुख संतोष भंडारे आणि त्यांच्या चमूने शोधमोहीम राबवून तीन मृतदेहांना बाहेर काढले.विशेष म्हणजे ट्रक चालक आणि क्लीनर मात्र,अजूनही बेपत्ता असल्याची माहिती तहसीलदार ओंकार ओतारी यांनी दिली.तिन्ही मृतदेह शवविच्छेदन साठी उपजिल्हा रुग्णालय अहेरी येथे पाठविले आहे.



### याच नाल्यात लाईनमन गेला वाहून

९ जुलै रोजी सकाळच्या सुमारास पेरमिली येथील नाल्यात एक इसम वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली. जितेंद्र दोडके वय (४०) असे मृत व्यक्तीचे नाव असून एम एस ई बी चा कर्मचारी (लाईनमन) आहे.त्याचे मृतदेह सापडले हे विशेष.

## विविध सामाजिक उपक्रमाने करण देवतळे यांचा वाढदिवस साजरा

# करण ग्रामीण जनतेचा आशेचा किरण : अहेतेशाम अली



**वरोरा / प्रतिनिधी**
भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव व माजी मंत्री स्वर्गीय संजय देवतळे यांचे सुपुत्र करण देवतळे यांचा २७ वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. यावेळी आपले मत व्यक्त करताना माजी नगराध्यक्ष तथा भाजपचे जिल्हासचिव अहेतेशाम अली म्हणाले की ग्रामीण जनता करण मध्ये साहेबांना बघत असून करण हा जनतेचा आशेचा किरण आहे. ग्रामीण जनता करण देवतळे यांच्या पाठीशी आहे.

आनंदवनातील स्वरानंदनवन मधील अपंग, मूकबधिर कलाकारांसोबत साजरा करून एक आदर्श निर्माण करून दाखविला.करण संजय देवतळे यांच्या या वाढदिवसाचा कार्यक्रम स्वर्गीय संजय देवतळे मित्र परिवारातर्फे आयोजित करण्यात आले होते.



सर्वप्रथम वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळ वितरण केले ,त्यानंतर आनंदवनातील रुग्णालयात असलेल्या रुग्णांना फळ व बिस्किट वितरित करून रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना छत्रीचे वितरण करण्यात आले. तसेच आनंदवनातील स्वरानंदनवन या ख्यातनाम आर्केस्ट्रा मधील विविध कलाकारांसोबत त्यांनी वेळ देऊन वाढदिवस साजरा करण्याचे ठरविले होते. आनंदवनातील सभागृहात केक कापून करण देवतळे यांचा वाढदिवस साजरा गेला केला. यावेळी संपूर्ण अंध व अपंग कलाकारांना करण देवतळे व श्वेता देवतळे यांच्या हस्ते छत्रीचे वाटप करण्यात आले व मधुर स्वरात कलाकारांनी गीत सादर केले.

श्रद्धे बाबा आमटे व साधना ताई आमटे तसेच स्व.शितलताई आमटे यांच्या समाधीस्थळी जाऊन त्यांना आदरांजली वाहिली व मूकबधिर लहान विद्यार्थ्यांना सुद्धा खाऊचे वाटप करण यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच शहरातील गजानन नगर येथील स्वर्गीय संजय देवतळे उद्यान मध्ये वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले. या विविध संपूर्ण कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष अहेतेशाम अली , भाजप नेते बाबासाहेब बागडे, भाजपा तालुका अध्यक्ष डॉ. भगवान गायकवाड, खरेदी विक्री संस्थेचे उपाध्यक्ष विजय मोकाशी ,संचालक बाळू भोयर, विठ्ठल लेडे, विलास गयनेवार, मोहन रंगदड, उमेश शर्मा, आशिष ठाकरे, अमित चवले, जगदीश तोटावर, विलास दारापुरकर, परसराम मरसकोल्हे, सुधाकर कुंकूले ,महेश श्रीरंग, अभिजीत गयनेवार, विशाल कुंकुले ,कादर शेख, सतीश कांबळे, चारू पाटील देवतळे, विशाल ढवस, डॉ. प्रफुल खुजे, गोपाल माकडे, निलेश देवतळे, सुरज येरने तसेच बरीच मित्रमंडळी अभिष्टचिंतन कार्यक्रमाला उपस्थित होती.

आनंदवनातील आयोजित वाढदिवस कार्यक्रमासाठी डॉ.अविनाश पोळ, सदाशिवराव ताजने, सुधाकर कडू गुरुजी, राजेश ताजने यांनी मोलाचे सहकार्य केले.







# पूरपरिस्थिती हाताळण्यासाठी शासन यंत्रणा सज्ज

नैसर्गिक आपत्तीपासून नागरिकांचे व सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी आपल्याला आपत्ती व्यवस्थापन करणे खूप गरजेचे आहे. विशेषतः पावसाळ्यात पूर, त्सुनामी, वादळवारा, दरडी कोसळणे, वीज पडणे अशा आपत्तीमुळे होणा?या नुकसानीपासून वाचण्यासाठी आणि जीवित व वित्त हानी रोखण्यासाठी शासनाने तयारी केली आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने राज्य शासनाच्या सर्व विभागांना नागरी/शहरी पूर आपत्ती प्रसंगी पूर्वतयारी व प्रतिबंधक उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. या सूचनांचे काटेकोर पालन केल्यास आपत्तीपासून बचाव होऊ शकेल.



**अशा आहेत सूचना..**

उच्चतम पूर पातळी ठरविणे.

तांत्रिकदृष्ट्या सक्षम समन्वय अधिकाऱ्यासह (नोडल ऑफिसर) नागरी पूर/पूर व्यवस्थापन यंत्रणा स्थापित करणे.

नागरी पूर व्यवस्थापन आणि उपक्षमन यासाठी प्रमाणित कार्यपध्दती लागू करावी. ) किनारवर्ती शहरे, ) मुख्य / मोठ्या नदी किनाऱ्यावरील शहरे, धरणांजवळील/जलाशयांजवळील शहरे, अंतर्गत शहरे, डोंगराळ प्रदेशातील शहरे, शहरांना वरीलप्रमाणे एक किंवा अनेक वैशिष्ट्ये असू शकतात.

नागरी पूर व्यवस्थापनासाठी सर्व भागीदारांची क्षमता बांधणी व उत्तम समन्वयासाठी मान्सूनपूर्व कार्यशाळेचे आयोजन करणे,

माहिती जनसंपर्क आणि शिक्षण- प्रत्येक शहराने पूर्वतयारीसह स्थानिक कल्याणकारी प्राधिकारी किंवा अन्य समाजगटांची प्रभागनिहाय यादी तयार ठेवावी व संपूर्ण शहरासाठी त्याचे सहाय्य घेणे.

मान्सूनचे आगमन होण्याच्या बऱ्याच कालावधीपूर्वी शहारातील जलाशयांच्या पाण्याचे शुध्दीकरण तसेच गटारांमधील गाळ प्रभावीपणे काढण्याची कार्यवाही पूर्ण करणे.

प्रत्येक शहरातील पाण्याच्या साठ्यांच्या स्थितीचे व मालकी हक्काचे सूचीकरण व मॅपिंग करणे.

शहरातील पूर परिस्थितीजन्य भागातील पाण्याचा उपसा करण्यासाठी पंप बसविणे.

विमानतळ असणाऱ्या शहराच्या समन्वय अधिकाऱ्यानी पावसाच्या सद्यःस्थिती व भाकितासंबंधीच्या स्थितीबरोबरच चक्रीवादळ व अतिवृष्टीची माहिती भारतीय हवामान विभागाकडून घेणे आवश्यक आहे. ही माहिती संस्थेकडून दर ३० मिनिटांनी अद्यावत करण्यात येते. जेव्हा चक्रीवादळ व अतिवृष्टीची स्थिती असते, तेव्हा ही माहिती महानगरपालिकेच्या आयुक्तांना तातडीने कळविणे गरजेचे असते, जेणेकरून ते सावधानता बाळगून त्यावर प्रतिबंधक उपाययोजना करतील. उदा. पूरग्रस्त व अतिवृष्टी क्षेत्रातील शाळा बंद करणे.

जलाशयातून/धरणातून पाण्याचा विसर्ग करण्याचा निर्णय जागेवर घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक शहरासाठी पुरेसे अधिकार असणाऱ्या उच्चस्तरीय तज्ञ समितीची स्थापना करणे. या समितीला अतिवृष्टीच्यावेळी पाण्याच्या विसर्गाच्या भाकिताचा आढावा घेऊन जलाशयाची/धरणाची द्वारे उघडून पाण्याचा विसर्ग करण्याचे अंतिम अधिकार राहील.

जलाशयातून/धरणातून पाण्याचा विसर्ग केला असता शेजारील राज्यांना ती माहिती त्याच वेळी देणे.

प्रत्येक राज्य/जिल्हा प्राधिकरणाने धोका नकाशा तयार करणे गरजेचे आहे. जेणेकरून उपलब्ध साधनांचा पुरेपूर वापर करता येईल.

पूराच्या मुख्य कारणांमध्ये अतिवृष्टी व बर्फ वितळणे यांचा समावेश होतो. त्यामुळे बर्फ वितळणे, ढगफुटीमुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीत धरणातून केला जाणारा पाण्याचा विसर्ग यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. आपत्तीच्या परिस्थितीचा पूर्वानुमान बांधून आपत्तीमध्ये लागणाऱ्या मूलभूत बाबी म्हणजे पाणीपुरवठा, अन्नपुरवठा, वैद्यकीय सोयी, स्वच्छतेच्या सोयी इत्यादीची माहिती राज्य शासनाने संग्रहित करून ठेवणे गरजेचे आहे. जेणेकरून आपत्तीच्या वेळी मदत पोहोचविणे सहज शक्य होईल.

आपत्ती संबंधातील माहिती त्याचवेळा मिळण्यासाठी राज्याने पूरनियंत्रण सॉफ्टवेअर विकसित करणे.

राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्याला आपत्ती सरावासाठी ०१ लाख रुपये राखून ठेवावे. राज्याने या निधीचा विनियोग विचारपूर्वक पध्दतीने करणे.

आपत्तीमध्ये काय करावे व काय करू नये याबाबतची माहिती जाहिरातीद्वारे स्थानिक भाषेत देणे.

राज्याने हवामानाच्या वृत्तांतासाठी प्रादेशिक भारतीय हवामान विभागाच्या संपर्कात रहावे.

राज्याने पुराच्या अंदाजासाठी केंद्रीय जल आयोगाच्या संपर्कात रहाणे.

किनारपट्टीच्या भागामध्ये छत नसलेल्या घरांच्या सुरक्षेसाठी ळ आकाराच्या गळाचा वापर करणे.

झाडांची नियमित छाटणी योग्य प्रकारे होते की नाही, तसेच जनजागृतीचे / जाहिरातीचे फलक सुस्थितीत आहेत की नाही याची खात्री करणे.

पावसाळ्यात येणारी पूरपरिस्थिती, वादळवारा, दरडी कोसळणे, त्सुनामी या नैसर्गिक आपत्तीविरुद्ध लढा देण्यासाठी राज्य शासन सज्ज झाले आहे. आपत्ती काळात मदतीसाठी शासन यंत्रणा तयार आहे.

**नंदकुमार ब. वाघमारे, माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे**

# एकल प्लास्टिकचा वापर टाळा प्रदूषणाला बसेल आळा



एकल वापर प्लास्टिक या नावावरुनच स्पष्ट होते की प्लास्टिकपासून बनवलेल्या अशा गोष्टी ज्यांचा वापर एकदाच केला जातो. एकदा वापरुन या गोष्टी फेकून दिल्या जातात. मात्र त्यांची विल्हेवाट सहजपणे लावता येत नाही. प्लास्टिकचे विघटन होत नाही आणि त्याला जाळून नष्टही करता येत नाही. प्लास्टिक जाळल्यास त्यामधून विषारी वायू बाहेर पडतात. तसेच या गोष्टींवर प्रक्रिया करुन त्यांचा पुनर्वापरही करता येत नाही. म्हणूनच प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणाचा विचार केला तर सर्वाधिक वाटा हा या एकल प्लास्टिकचाच असतो, असे समोर येत आहे. दिनांक १ जुलै पासून सर्वत्र एकल वापर प्लास्टिकला बंदी घालण्यात आली. अशा प्लास्टिकचा वापर करताना आढळल्यास नियमानुसार दंडात्मक कारवाई सुध्दा करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागाच्या दिनांक १२ ऑगस्ट २०२१ रोजीच्या अधिसुचनेनुसार १ जुलै २०२२ पासून एकल वापर प्लास्टिकचे उत्पादन, आयात, साठवण, वितरण, विक्री आणि वापरावर बंदी घालण्यात आली आहे.



**दैनंदिन वापरातील प्लास्टिक**

आपल्या दैनंदिन जीवनामध्ये एकल वापर प्लास्टिक कुठे कुठे वापरलं जात तर कान कोरण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या काड्या म्हणजेच इयर बड्स स्टीक्स, बलून स्टीक्स, प्लास्टिकचे झेंडे, लॉलीपॉपमध्ये वापरण्यात येणाऱ्या काड्या, आइस्क्रीमच्या काड्या, थर्माकॉलपासून बनवलेलं सजावटीचं सामान, प्लास्टिकचे कप, प्लास्टिकच्या प्लेट्स, प्लास्टिकपासून बनवलेले काटे चमचे, शितपेय पिण्याच्या नळ्या (स्ट्रॉ), आमंत्रण कार्ड, सिगारेटच्या पाकिटाभोवती प्लास्टिक फिल्म गुंडाळणे किंवा पॅक करणे, मिठाईच्या बॉक्सवर वापरलं जाणार आवरण, पत्रिकांवर शोभेसाठी वापरलं जाणार प्लास्टिक, आणि १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाड असणारं सर्व प्रकारचं प्लास्टिक हे एकल वापर प्लास्टिक मध्ये मोडते.

याबरोबरच महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अधिसूचना २०१८ अंतर्गत सर्व प्रकारच्या हँडल असलेल्या व नसलेल्या प्लास्टिक पिशव्या, कचरा व नर्सरीच्या पिशव्या सोडून कंपोस्टेबल प्लास्टिक, सर्व प्रकारच्या पॉलीप्रोपिलीन पासून बनवलेले नॉन ओव्हन बॅग्ज तसेच एकल वापर प्लास्टिकचे उत्पादनास मार्च २०१८ पासून प्रतिबंध करण्यात आला आहे.

**'व्यायामाच्या माध्यमातून स्वच्छता'**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पुणे महानगरपालिकेतर्फे प्लॉगेथॉन (जॉगिंग विथ पिकिंग अप लिटर) मोहिम राबविण्यात आली. उत्तम आरोग्यासाठी अनेकांना सकाळी फिरण्याची सवय असते. याला कचरा संकलनाची जोड दिल्यास समाजासाठीही काही केल्याचे समाधान जॉगर्सना मिळाले. पुणे शहरातील एकूण १३४ रस्त्यांवर सुमारे दीड लाख नागरिकांनी प्लास्टिक कचरा गोळा करण्यासाठी पुणे प्लॉगेथॉन मध्ये सहभाग नोंदवला. विविध टेकड्या रामनदी, पुणे शहरातील विविध नदी घाट येथेही स्वच्छता करण्यात आली.

प्लास्टिक वेगवेगळ्या मार्गांनी नद्या आणि समुद्रामध्ये पोहोचतं. तसेच प्लास्टिकचे छोटे छोटे कण पाण्यामध्ये मिसळतात. यामुळे नद्या आणि समुद्राचं पाणीही दूषित होतं. त्यामुळेच प्लास्टिकवर बंदी घातली तर निर्माण होणाऱ्या प्लास्टिकच्या कचऱ्याच्या प्रमाणामध्ये घट होईल आणि याचं नियोजन योग्य पद्धतीने होऊ शकेल.

**दंड..**

प्लास्टिक वापराबाबत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर माल जप्त करणे, पर्यावरणीय नुकसान भरपाई आकारणे,उद्योग, व्यावसायिक आस्थापना यांचे कामकाज बंद करणे तसेच पहिल्या गुन्ह्याप्रकरणी ५ हजार रुपये, दुसऱ्या प्रकरणी १० हजार रुपये दंड आकारला जाईल तर तिसऱ्या गुन्ह्याप्रकरणी २५ हजार रुपये दंड व ३ महिन्याचा कारावास अशी कारवाई करण्यात येईल. त्यामुळे सर्व उत्पादक, साठवणूकदार, वितरणकर्ता, दुकानदार, ई कॉमर्स कंपन्या, रस्त्यावर विक्री करणारे व्यावसायिक, मुख्य बाजार विक्री केंद्र, सिनेमागृह, पर्यटन ठिकाणे, शाळा, कार्यालयीन इमारती, रुग्णालये, खाजगी संस्था तसेच सामान्य नागरिकांनी एकल प्लास्टिक वापर टाळून प्रदूषणाला आळा घालण्याचा प्रयत्न करणे ही सर्वांची जबाबदारी आहेच पण सुदृढ भविष्यासाठी गरजेचे आहे. तेव्हा एकल प्लास्टिकचा वापर टाळा.. त्यामुळे निश्चितच प्रदूषणाला बसेल आळा.

**गीतांजली अवचट, माहिती सहायक विभागीय माहिती कार्यालय, पुणे.**

# पेरणी... शालेय कृषि शिक्षणाची!

जुलैच्या पहिल्या आठवड्यातील गोष्ट. विष्णुपुरीच्या शाळेतल्या मुलांची त्या दिवशी वेगळीच गडबड सुरू होती. रोजच्या सारखीच त्यांची पावले वेळेवर शाळेत पडली. शाळेत प्रवेश केल्यानंतर त्यांचा उत्साह मात्र द्विगुणित झाला. याला कारण होते स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त शाळेत साजरा केला जाणारा कृषि दिन ! यात आणखी भर पडली ती म्हणजे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे या स्वतः शाळेतल्या वर्गाचा तास घेणार याची. जिल्हा परिषदेच्या शाळात बहुतांश मुले ही शेतकऱ्यांची आहेत. शेतीबद्दल, शेती करणाऱ्या आपल्या पालकांबद्दल मुलांच्या मनात स्वाभिमान निर्माण व्हावा यासाठी त्यांनी कृषि दिनानिमित्त एका तास शेतीशी संबंधित घेण्याचा विचार मांडला. या विचाराला सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ प्रतिसाद दिला.



दिवसेंदिवस निसर्गाच्या लहरीपणामुळे पिकांना पाहिजे तेव्हा पाणी आणि पाहिजे तेव्हा ताण मिळत नाही. यामुळे बहुतांश शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे गणित बिघडते. शेतीची ही परिस्थिती शेतकऱ्यांच्या मुलांच्या डोळ्यात विनाविलंब सामावून जाते. शेतीसाठी आपल्या पालकांची होणारी घालमेल ही मुले लपवू शकत नाहीत. त्यांना परिस्थितीची जाणिव असते यात शंकाच नाही. अशा स्थितीत मुलांच्या मनात शेतीबद्दलच जर नकारात्मक भाव निर्माण होत असेल तर ही पिढी शेतीकडे भविष्यात वळणार नाही. त्यांच्या मनात शेतीबद्दल अनास्था निर्माण होईल. अप्रत्यक्षरित्या हे भविष्यातील कृषिक्षेत्रालाच मोठे आव्हान देणारे ठरेल.

यावर मात करण्यासाठी ज्या-ज्या भागात पाण्याची उपलब्धता आहे त्या-त्या भागात उपलब्ध असलेल्या पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी उच्च कृषि तंत्रज्ञानाचे पर्याय शेतकऱ्यांना देणे हे आवश्यक आहेत. शासनाच्या कृषिक्षेत्रासाठी असलेल्या अनेक योजना आहेत. यातील ठिबक आणि तुषार सिंचनची योजना ही केवळ पाण्याचीच बचत करत नाही तर भरघोस उत्पन्नाची हमी देते. यात तंत्रकुशलता आवश्यक असल्याने आजच सुशिक्षित पिढी आकर्षित होऊ शकेल. वाढणाऱ्या उत्पन्नातील फरक त्यांना कमाईच्या माध्यमातून दिसू शकेल. थोडक्यात दृश्य स्वरुपात दिसणारे हे परिवर्तन आहे.

ज्या भागात पाणीच उपलब्ध नाही, कोरडवाहू शेती आहे, अथवा जे काही पाणी लागलेले आहे ते कोणत्याच पिकांना पुरणारे नाही, अशा भागासाठी शेती पूरक उद्योगांना चालना दिल्याशिवाय पर्याय नाही. कृषि विद्यापिठाने शेतीच्या प्रत्येक पोतानुसार, नैसर्गिक परिस्थितीनुसार पिकांचे नियोजनही करून दिलेले आहे. एका बाजूला शासनाच्या ज्या काही यंत्रणा आहेत त्या सर्व यंत्रणा प्रयत्नांची पराकाष्ठा करून शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतीला भेट व चर्चा, आत्मा, बचतगट, शेतमाल उत्पादक संघ हे अलिकडच्या काळात बळ देणारे उपक्रम आहेत.

एका बाजुला शासनाचे प्रयत्न असूनही काही भागांमध्ये निसर्गाच्या प्रकोपामुळे शेतकऱ्यांपुढे आव्हानांची मालिका कमी लेखता येणार नाही. असंख्य शेतकऱ्यांना पेरणीसाठी शेतशिवार तयार करण्यापासून ते बि-बियाणांच्या व्यवस्थापनापर्यंत आर्थिक बाबीसाठी करावी लागणारी कसरत सोपी नाही. यासाठी प्रधानमंत्री किसान योजना, पीक कर्ज योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म योजना, कृषि यांत्रिकी योजना, कापूस उत्पादकता व सोयाबीन उत्पादकता वाढ योजना व मूल्य साखळी योजना, नानाजी देशमुख कृषी संजीविनी योजना अशा अनेक योजना महत्वाच्या आहेत. जिल्ह्यातल्या दुर्गम भागापासून डोंगर-दऱ्यात वसलेल्या वाड्या-पाड्यांवरच्या मुलांना शिक्षणाचा प्रवाहात येता यावे, कोणताही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळा या योगदान देत आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार अपवादात्मक काही ठिकाणी दोन शिक्षकी शाळाही आहेत. काही गावांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड असल्याने त्या प्रमाणात शिक्षकांची नेमणूक आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेत जवळपास ८ हजार ५९९ शिक्षक आहेत. जिल्हा परिषदेच्या एकुण शाळा २ हजार १९५ शाळा आहेत. जवळपास २ लाख १० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. खाजगी शाळांसह शिक्षकांची संख्या ३ हजार ७३९ तर या विद्यार्थ्यांसह एकूण ६ लाख ३५ हजार एवढे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या मनात शेतीविषयी आवड निर्माण केली तर त्यांच्या नजरेत शेतकरी घेत असलेले कष्ट सहज उजळून निघतील. शेतीच्या श्रमाला त्यांच्या मनातही प्रतिष्ठा निर्माण होईल.

भविष्यातील शेतीला अधिक शाश्वत जर करायचे असेल तर त्यासाठी शेती समजणारी पिढी तयार करावी लागेल. आज ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिकणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांना नवा विश्वास द्यावा लागेल. ही जबाबदारी शासनासह समाजाची असून याकडे व्यापक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. शासन यासाठी प्रयत्नशील आहे. सेंद्रीय शेतीचे मूल्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचावे, उपलब्ध असलेल्या पाण्याच्या काटेकोर वापरासाठी उच्च तंत्रज्ञानाची जोड देणे, शेतकऱ्यांना त्या-त्या योजनांच्या पात्रतेनुसार लाभ देणे यासाठी कृषि विभाग सातत्याने राबत आहे. समाज म्हणून आपणही व याचबरोबर ग्रामीण भागातील प्रत्येक ग्रामपंचायतीने अधिक डोळस पुढाकार घेतला तर शेतीच्या भवितव्यासह यातील अर्थकारणालाही अधिक समृद्ध करता येईल. प्रत्येक पाऊल हे नव्या पिढीला कृषि ज्ञानाशी, शेतीशी जोडणारे असेल पाहिजे. कृषि दिनानिमित्त नांदेड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळांमध्ये शेतीविषयी घेतलेला एक तास हा या सशक्त पाऊलापैकीच एक पाऊल ठरले आहे.

**- विनोद रापतवार,**
**जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड**

# महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध : वरखेडकर

## कोविड-१९ विषाणू व शेतकरी आत्महत्यामुळे मृत्यूमुखी झालेल्या व्यक्तींच्या विधवा महिलांचा संयुक्त मेळावा

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

कोरोना माहामारीमुळे अनेक कुटुंबातील कर्ता व्यक्ती गेल्यामुळे या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. ही हाणी कधीही भरून निघू शकत नाही. मात्र अशा कुटुंबाना सर्वोतोपरी मदत करणे आपले कर्तव्य आहे. त्यामुळे या महिलांच्या तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी विद्युत वरखेडकर यांनी केले.



मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत कोविड-१९ विषाणूंमुळे व शेतकरी आत्महत्यामुळे मृत्यूमुखी झालेल्या व्यक्तींच्या विधवा महिलांचा मेळावा बल्लारपूर, उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या सभागृहात नुकताच घेण्यात आला. त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी डॉ.दिप्ती सुर्यवंशी-पाटील उपस्थित होत्या.

महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्व विभागाने एक नोडल अधिकारी नियुक्त करून दर पंधरवाड्यात तहसीलदार यांनी आढावा घ्यावा, असे निर्देश अतिरिक्त जिल्हाधिकारी विद्युत वरखेडकर यांनी दिले. यावेळी त्यांच्या हस्ते आत्महत्या केलेल्या ३ शेतकऱ्यांच्या विधवा महिलांना प्रत्येकी १ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदानाचे धनादेश वाटप करण्यांत आले. या मेळाव्यात शशिकांत मोकाशी, उद्योजकता स्किल्स ट्रेनर यांनी महिला सक्षमीकरण करण्यासाठी शासनाने केलेल्या अनेक उपाययोजना व त्याचे फायदे याबाबत माहिती दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बल्लारपूरचे तहसीलदार संजय राईंचवार यांनी शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय योजनांची माहिती दिली. तसेच विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुद्धा उपस्थित महिलांना मार्गदर्शन करीत विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

तहसील कार्यालय आणि महिला, बालकल्याण विभागाच्या वतीने आयोजित या मेळाव्याचे संचालन देवगडे यांनी तर आभार रोशनी यांनी मानले. यावेळी बल्लारपूर येथील गटविकास अधिकारी किरण धनवाडे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक गजानन मेश्राम, बालविकास प्रकल्प अधिकारी रमेश टेटे, रिना सोनटक्के, गट शिक्षणाधिकारी लामगे, सहाय्यक मुख्याधिकारी जयवंत काटकर, पोलिस निरीक्षक शैलेश ठाकरे, तालुका आरोग्य अधिकारी मामीडवार, नायब तहसीलदार सतीश साळवे, पुरवठा निरीक्षक प्रियंका खाडे, जिल्हा समन्वय अधिकारी अजय साखरकर आदी उपस्थित होते.

# पोंभुर्णा येथील ग्रामीण रूग्णालय त्वरीत जनतेच्या सेवेत रूजु करावे

## आ. मुनगंटीवार यांच्या सुचनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

जिल्हयातील पोंभुर्णा येथील नवनिर्मित ग्रामीण रूग्णालय त्वरीत लोकार्पित करण्यात यावे व त्यादृष्टीने आवश्यक बाबींची तातडीने पूर्तता करावी असे निर्देश जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांनी दिले.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सुचनेनुसार जिल्हाधिकारी डॉ. अजय गुल्हाने यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबत ८ जुलै रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, अतिरिक्त जिल्हाधिकारी विद्युत वरखेडकर, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे टांगले, सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत शाखेचे महाजन, मुख्याधिकारी न.प. पोंभुर्णा, पोंभुर्णा नगर पंचायत अध्यक्षा सुलभा पिपरे, माजी पंचायत समिती सभापती अलका आत्राम, माजी जि.प. सदस्य राहूल संतोषवार आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.



यावेळी जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांनी सदर ग्रामीण रूग्णालयाच्या बांधकामाचा आढावा घेतला. अग्नीशमन व्यवस्थेसंदर्भात नगर परिषद मुख्याधिका-यांनी प्रस्ताव तपासून मंजूरी द्यावी, पदभरतीबाबत उपसंचालक आरोग्य सेवा यांनी कंत्राटी पदांना तातडीने मंजूरी द्यावी, विद्युत ट्रान्सफॉर्मर संदर्भात नगर पंचायतीने ३ लाख ५० हजार रू. किंमतीचे डिमांड शुल्क भरावे व महावितरणने ट्रान्सफॉर्मर बसविण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी. सदर ग्रामीण रूग्णालयात नगर पंचायतीच्या पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातुन पाणी पुरवठा नगर पंचायतीने करावा. या ग्रामीण रूग्णालयात हाफकीनच्या माध्यमातुन १ कोटी रू. किंमतीचे साहित्य प्राप्त झाले असून उर्वरित साधनसामुग्रीसाठी जिल्हा वार्षीक योजनेअंतर्गत निधीची मागणी जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी करावी असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या माध्यमातून नाबार्ड स्थापना दिवस साजरा...



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा तुकूमच्या माध्यमातून ज्ञानज्योती सभागृह दुर्गापूर येथे नाबार्ड स्थापना दिवसानिमित्त महिला मेळाव्याचे अजून करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख स्थानी जिल्हा अग्रणी बँकेचे एलडीएम प्रशांत धोंगळे, नाबार्डचे डीडीएम तृणाल फुलझेले, शाखा व्यवस्थापक सतीश वऱ्हाडे, नवदृष्टि संस्थेचे संचालक निलेश देवतळे, अक्षय देशमुख उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रशांत धोंगळे यांनी महिलांना बँकेत खाते तयार करणे, बचत गटातून व्यवसाय तयार करणे, डिजिटल युगात व्यवहार करताना जागरूकता बाळगावी असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी तृणाल फुलझेले स्थापना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या व नाबार्ड स्थापनेचा उद्देश, नाबार्डद्वारा राबविण्यात येणार विविध उपक्रम, एस.एच.जी., जे.एल.जी.व विविध योजनांची माहिती देऊन महिलांना मार्गदर्शन केले.

विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या माध्यमातून नाबार्ड स्थापना दिवसानिमित्त आयोजित महिला मेळाव्यात बोलताना ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक सतिश वऱ्हाडे म्हणाले की महिलांच्या सबलीकरणावर बँकेने विशेष भर दिला असून बँकेच्या अनेक योजना महिलांचे जीवनमान उंचावणारे आहे. ग्रामीण बँकेच्या माध्यमातून अटल पेन्शन, जीवन ज्योती, सामाजिक विमा आदी योजना राबवल्या जातात.

बँकेच्या विविध योजनेतून महिलांना कर्ज दिला जातो. स्वयंरोजगारासाठी महिलांना कर्ज पुरवठा केला जातो. बँकेच्या योजनातून महिलांचा विकास शक्य असल्याने महिलांनी या योजनांचा लाभ घ्यावा असे आव्हान शाखा व्यवस्थापक सतिश वऱ्हाडे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश देवतळे, संचालन शिल्पा पागडे तर आभार मंगला घटे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी हेमा पागडे, अरुणा खोब्रागडे, अक्षय देशमुख यांचे सहकार्य लाभले.

# ...अन संकट काळात धावून आले 'टायगर ग्रुप'चे सदस्य

## पावसाळयातील संकटासाठी सज्ज

**गडचिरोली / प्रतिनिधी**

'तुम्ही हाक मारा,आम्ही हजर असू' हे ब्रीद वाक्य घेऊन आलापल्ली येथील 'टायगर ग्रुप' याही वर्षी सर्व साधनसामुग्रीसह सज्ज झाली आहे. पावसाळ्यात येणाऱ्या आपत्तीमध्ये मग तो पूर असो किंवा वादळ आम्ही कुठेही, केव्हाही मदतीसाठी धावून येऊ, अशी ग्वाही या टायगर ग्रुपच्या सदस्यांनी दिली.नुकतेच ८ जुलै पासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे ९ जुलै रोजी अहेरी उपविभागातील पाचही तालुक्यांना पूर परिस्थितीचा सामना करावा लागला. पूर परिस्थितीमुळे राष्ट्रीय महामार्गासह इतर मार्गही बंद होते. नदी- नाल्यावर पूर परिस्थिती असल्यामुळे एसटी महामंडळची बस असो किंवा खाजगी वाहने आहे तिथेच अडकून पडले होते.नागेपल्ली येथे तब्बल ७ तास वाहतूक ठप्प झाली होती. ही बाब आलापल्ली येथील टायगर ग्रुप च्या सदस्यांना कळताच त्यांनी बसमधील प्रवाश्यांना स्वखर्चाने अल्पोपहाराची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली.एवढेच नव्हेतर आलापल्ली येथील गोलकर मोहल्ला प्रभाग क्रमांक ६ मध्ये काही लोकांच्या घरात पाणी शिरल्याने या ग्रुपच्या सदस्यांनी त्वरित धाव घेऊन घरातील समान काढून सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे काम केले. अशा विविध सामाजिक कामामुळे या ग्रुप मध्ये असलेल्या तरुण वर्गाचा सध्या अहेरी उपविभागात चांगलीच चर्चा होत आहे.



गडचिरोली जिल्ह्याच्या दक्षिण भागात विविध सामाजिक संस्था काम करत असतात मात्र आलापल्ली येथील टायगर ग्रुप चे सदस्य आपली भली मोठी फौज उभी करून आलापल्ली ते सिरोंचा पर्यंत याचा विस्तार केला आहे. या परिसरात कुठेही अपघात झाला, रक्त देण्याची पाळी आली, घरात पाणी शिरला, बचाव कार्य असो, मृतदेह गावी पोहोचविणे किंव्हा आर्थिक मदत असो यासाठी हा ग्रुप २४ तास उपलब्ध असते.

विशेष म्हणजे या ग्रुपकडे दोन ॲम्बुलन्स असून सध्या एक ॲम्बुलन्स नादुरुस्त स्थितीत आहे. अशाही परिस्थितीत एक ॲम्बुलन्स घेऊन रुग्णांना,अपघात ग्रस्तांना त्वरित उपचारासाठी रुग्णालयात कसे दाखल करता येईल,यासाठी प्रत्येक सदस्य सज्ज असतात. फेसबुक,वॉट्सप, ट्विटर आणि इन्स्टाग्रामवर हे सदस्य सक्रिय असून स्वतःचे भ्रमणध्वनी क्रमांक मदतीसाठी प्रत्येक ठिकाणी वायरल करून ठेवले आहेत. त्यामुळे कुठेही अपघात झाल्यास किंवा कोणालाही अडचण भासल्यास या सदस्यांना त्वरित कॉल किंवा मेसेज येतो आणि या ग्रुपचे सदस्य त्या ठिकाणी हजर होतात.

कोरोना काळात कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी राज्यासह देशभरात संचारबंदी लागू केली होती. सर्वत्र लॉकडाऊन करण्यात आले होते. अशा परिस्थितीत लोकांच्या हाताला काम नव्हते तसेच त्यांना दुसरीकडे कामालाही जाता येत नसल्याने अशा परिस्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा अशा विवंचनेत सापडलेल्या गरीब व सर्वसामान्य कुटुंबांना या ग्रुपने मोठी मदत केली होती.सध्या अहेरी उपविभागातील सिरोंचा, एटापल्ली, मुलचेरा, भामरागड सारख्या तालुक्यातील नागरिकांना टायगर ग्रुप च्या माध्यमातून मदतीचा हात मिळत आहे. त्यामुळे या भागात 'टायगर ग्रुप'ची चर्चा सर्वत्रच केली जात आहे. आतापर्यंत या ग्रुपच्या माध्यमातून १८०० हून अधिक रुग्णांना निशुल्क रक्तपुरवठा झाला आहे.जवळपास ३० जणांचे रुग्णालयात पोहोचवून प्राण वाचविण्यात त्यांना यश आले आहे.तर, शवविच्छेदनासाठी आलेले १२ मृतदेह घरी निशुल्क सोडून दिले आहे.

### पाळीव प्राण्यांच्या उपचारासाठीही ग्रुप सज्ज

सध्या पावसाळा असून या कालावधीत पाळीव प्राण्यांना विविध आजार उद्भवतात. अशावेळी त्वरित उपचार मिळावा यासाठी या ग्रुपने आपल्या ग्रुपमध्ये एका पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचा समावेश केला आहे. कुठलीही पाळीव प्राणी आजारी असल्याची माहिती मिळताच हा ग्रुप पशुवैद्यकीय अधिकाराच्या माध्यमातून ही समस्या सोडवितात.

# अहेरी उपविभागाला मुसळधार पावसाचा तडाखा

## नदी-नाल्यांना पूर तर, अनेक भागांचा संपर्क तुटला



**महेश गुंडेटीवार / गडचिरोली**

मान्सूनने महाराष्ट्राचा संपूर्ण भाग व्यापला असून आता पूर्व विदर्भातही जोरदार पाऊस सुरू आहे.पूर्व विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पावसाने झोडपलं आहे.जिल्ह्यातील अहेरी उप विभागातील अहेरी,सिरोंचा, एटापल्ली, भामरागड आणि मुलचेरा या तालुक्यामध्ये जोरदार पाऊस झाला आहे.

पावसामुळे सायंकाळ पर्यंत राष्ट्रीय महामार्गासह अनेक रस्ते बंद होते. सकाळपासूनच मुलचेरा, सिरोंचा आणि भामरागड तालुक्यांचा संपर्क तुटला होता.मध्यरात्रीपासूनच अहेरी उप विभागात मेघ गर्जनेसह मुसळधार पावसाचे आगमन झाले होते.९ जुलै रोजी सकाळी पावसाने रौद्ररूप धारण करताच सर्वत्र जलमय वातावरण दिसून आले. अहेरी आणि मुलचेरा तालुक्यातील बहुतांश ठिकाणी घरात पाणी शिरल्याने नागरिकांचा खूप मोठा नुकसान झाला आहे.

### हत्तीकॅम्प साठी प्रसिद्ध असलेल्या कमलापूरचाही तुटला संपर्क

वन विभागाच्या शासकीय हत्तीकॅम्प साठी राज्यात प्रसिद्ध असलेल्या कमलापूर गावाचा पहाटे सुमारास संपर्क तुटला.या भागात मध्यरात्री पासूनच मुसळधार पाऊस सुरू होता.पहाटेच्या सुमारास रेपनपल्ली ते कमलापूर दरम्यान असलेल्या नाल्याला पूर आल्याने कमलापूर चा संपर्क तुटला.तर,येथील काही घरांत पाणी शिरले होते.छल्लेवाडा येथील बिमारगुडा जवळील नाल्याला पूर आल्याने गावातील काही घरात पाणी शिरला.उमानूर जवळील मरपल्ली येथील नाल्याला पूर आल्याने गावात सर्व पाणीच पाणी दिसून आले. मरपल्ली गावाला पाण्याचा वेढा असल्याचे दृश्य दिसत होते.आदी गावानांही मुसळधार पावसाचा फटका बसला.

### राष्ट्रीय महामार्गासह प्रमुख मार्ग होते बंद



अति मुसळधार पावसामुळे भामरागड तालुक्यातील व आलापल्ली ते भामरागड या राष्ट्रीय महामार्गावरील कुमरगुडा नाल्यावरील रपटा वाहून गेल्याने आणि पेरमेली जवळच्या नाल्याला पूर आल्याने राष्ट्रीय महामार्ग बंद होते.आलापल्ली ते सिरोंचा राष्ट्रीय महामार्गावरील मेडारम आणि बामणी नाल्याला पूर आल्याने या महामार्गावरील रहदारी बंद होते. आलापल्ली ते आष्टी या राष्ट्रीय महामार्गावरील चौडमपल्ली येथील दीना नदीला पूर आल्याने हा मार्ग सुद्धा दुपारपर्यंत बंद होता.खमनचेरू जवळील नदीला पूर आल्याने काही काळ वाहनांची रांग लागली होती.मूलचेरा तालुक्यात गोमनी, आंबटपल्ली, भवानीपूर, बारसवाडा आणि गणेशनगर ते मुलचेरा दरम्यान असलेल्या नाल्याला आणि मुलचेरा ते आष्टी मार्गावरील दीना नदीला पूर आल्याने दुपारी १ वाजेपर्यंत रहदारी ठप्प झाली होती.बारसवाडा येथील जिल्हा परिषद शाळेलगत असलेल्या नाल्याला पूर आल्याने बारसवाडा गाव काही काळ संपर्क क्षेत्राच्या बाहेर होता.तर येथील जिल्हा परिषद शाळेत मोठ्या प्रमाणात पुराचा पाणी शिरला.शाळेजवळ असलेल्या काही घरात पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले.शनिवार असल्याने विद्यार्थ्यांना सकाळची शाळा होती.सुंदरनगर येथील नेताजी सुभाषचंद्र विद्यालयात शिक्षण घेणारे गोविंदपूर, हरीनगर ,मथुरानगर परिसरातील बरेच विद्यार्थी खुदीरामपल्ली येथे अडकले होते.आंबटपल्ली नाल्यावरील पूर ओसरल्यावर दुपारी २ वाजता विद्यार्थी आणि कर्मचारी आपल्या घरी परतले.

### पंचनामे करून त्वरित नुकसान भरपाई द्या

अहेरी उप विभागातील बरेच तालुक्यात पूरपरिस्थिती होती.नदी-नाल्यात पूर आल्याने अनेकांच्या घरात पाणी शिरले.त्यामुळे घरातील चैनीच्या वास्तुसह महत्वाच्या साहित्याचे नासधूस झाले.घरांची पडझड नसलीतरी यात नागरिकांचे नुकसान झाल्याचे बोलले जात आहे.त्यामुळे प्रशासनाने त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे



# चंद्रपूर जिल्ह्यात पावसामुळे जनजीवन विस्कळीत

## सहा जण असलेला ऑटो नाल्यात बुडाला

### आर्मी सैनिक निखील काळे यांच्या समय सुचकतेने मोठा अनर्थ टळला



**भद्रावती / प्रतिनिधी**
तालुक्यातील पानवडाळा - टाकळी मार्गावरील नाल्यात दि. ९ जुलै रोजी २ वाजताच्या सुमारात सहा प्रवाशी असलेला ऑटो बुडाला. परंतु पानवडाळा येथील आर्मी सैनिक निखील काळे यांनी दाखविलेल्या समय सुचकतेने मोठा अनर्थ टळला. ऑटो मधील चालकासह सहा जणांची सुटका करण्यात यश आले.

शनिवारला भद्रावती वरुन एक ऑटो पानवडाळा येथील पाच प्रवाशी घेऊन निघाला. या ऑटोत पाच प्रवाशी आणि एक चालक असे सहा जण होते. सदर ऑटोने टाकळी गाव पार केला. यानंतर टाकळी गावाजवळ असलेल्या नाल्याजवळ हा ऑटो आला. दरम्यान या नाल्याला पुर आला होता. मार्गावरुन थोडे फार पाणी वाहात होतो. यावेळी ऑटो चालकाने पुलावरून मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न केला. अचानकपणे ऑटो नाल्याच्या प्रवाहात बुडाला. आरडाओरड केल्यानंतर घटना स्थळी एकच गर्दी जमली. त्यावेळी नुकतेच रजेवर आलेले पानवडाळा येथील आर्मी सैनिक निखिल काळे यांनी समय सुचकता दर्शवित घटनास्थळी असलेल्या नागरिकांच्या मदतीने बचाव कार्य सुरु केले. ऑटो तील प्रवाशांना वाचविण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरू झाले. या ठिकाणी असलेल्या रेतीत ऑटो अडकला . यावेळी नाल्यातून जोरदारपणे पाणी वाहून जात होते. ऑटोला दोर बांधून पाण्याबाहेर ओढण्यात आले. सुखरुपपणे सहाही जणांना बाहेर काढण्यात आले. या बचाव कार्यात आर्मी सैनिक निखील काळे, ईश्वर उताणे, गुणवंत उताणे, आचल आसेकर, विठ्ठल काळे, अनुप आसेकर, प्रविण आवारी, प्रविण डोये यांच्यासह टाकळी येथील नागरिकांनी सहकार्य केले.

## मेघ गर्जनेसह जोरदार पाऊस



**गोंडपिपरी / प्रतिनिधी**
तालुक्यात सकाळी मेघ गर्जना व विजेच्या कडकडाटसह मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली.
तालुक्यात दोन गावात वीज कोसळली राळापेठ येथिल जिल्ह्या परिषद प्राथमिक शाळेवर वीज कोसळल्याने तीन विद्यार्थी कीरकोळ जखमी झाल्याची घटना घडली ही घटना ताजी असतानाच विठ्ठलवाडा शेत शिवारात चिंचेच्या झाडावर वीज कोसळल्याने झाडाखाली ठेवलेलं संपूर्ण शेतीउपयोगी साहित्य जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांचे चाळीस हजाराचे नुकसान झाले.
गोंडपिपरी तालुक्यात पावसाने दमदार हजेरी लावली.सकाळ पासून आकशात मेघ दाटले; अंधकार झाला. अचानक मेघ गर्जनेसह विजेचा कडकडाट सुरू झाला. अश्यातच शनिवार असल्याने तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा सकाळी सात वाजता भरल्या. ऐन सुट्टी होण्याच्या वेळात दमदार पाऊस सुरू झाला. त्यामुळे शिक्षकांसह विद्यार्थी सुद्धा पाऊस थांबण्याची वाट बघत शाळेतच थांबले होते.दरम्यान शाळेच्या इमारतीवर वीज कोसळली. यात तिन विद्यार्थी जखमी झाले. अमर माधव राऊत, राशी विनायक ताजने , निशांत अंगुलमान उराडे असे जखमी विद्यार्थीचे नावे आहेत. वीज कोसळल्याने शाळेतील सर्व लाईन टीव्ही, पंखे,सर्व विद्युत उपकरणे जळून खाक झाल्याने शाळेचे लाखों रुपयाचे नुकसान झाले. तर विठ्ठलवाडा येथील पुंजाराम पिपळकर यांच्या शेतातिल चिंचेच्या झाडावर वीज कोसळली झाडाखाली झोपडीत २० पाईप , २० खत बॅग, गुरांचा खादय यासह शेतिउपयोगी सर्व साहित्य जळून राख झाल्याने ४० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. शासनाकडून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्याने केली आहे.

## वीज पडून इसमाचा मृत्यू

**ब्रम्हपुरी / प्रतिनिधी**
तालुक्यातील अडयाळ येथील मामा तलावात मच्छीमारी करणारे नारायण शिवराम कामडी वय:४५ वर्ष, राह. चोरटी यांच्यावर वीज पळल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाल्याची घटना घडली. ब्रम्हपुरी तालुक्यातील आज आलेल्या पावसासोबतच विजांचा कराड झाला. त्यामध्ये अड्याळ येथील मामा तलावात मच्छिमार करणारे नारायण शिवराम कामडी यांचा जागीच मृत्यू झाला त्यांची माहिती ब्रह्मपुरी पंचायत समितीचे माजी उपसभापती तथा उपसरपंच नामदेव लांजेवार यांना कळताच त्यांनी लगेच पोलीस ठाण्यात भ्रमण ध्वनी कळवले. घटनास्थळी परिसरातील जनतेने पाहण्यासाठी एकच गर्दी केली होती. घटनास्थळी काही वेळानी पोलीस विभागाचे व महसूल विभागाने कर्मचारी उपस्थित झाले.

### रेल्वे पटरी खाली खोदलेल्या बोगद्याच्या मातीमुळे पाण्याचा मार्ग अडल्याने

## देऊळवाडा शिवारातील शेतीत पाणी घुसले




**भद्रावती / प्रतिनिधी**
तालुक्यात अतीवृष्टी होत असून या आठवडयात जोरदार पाऊस बरसत आहे. भद्रावती - देऊळवाडा मार्गावरील रेल्वे गेटजवळच्या रेल्वे पटरी खाली खोदलेल्या बोगदयाच्या मातीमुळे पाणी वाहून जाण्याचा नेहमीचा मार्ग अडला. यामुळे देऊळवाडा शेत शिवारातील सुमारे वीस शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसल्याने या शेतकऱ्यांच्या पिकांची अपरिमित हानी झाली. या सर्व नुकसानीचे प्रशासनाच्या माध्यमातून विनाविलंब सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना भरीव आर्थीक सहकार्य करावे. अशी मागणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक तथा श्रीनिवासराव शिंदे मेमोरिअल रविंद्र शिंदे चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र शिंदे यांनी केली आहे.दि. ९ जुलै रोजी देऊळवाडा येथील पर्जन्य स्थितीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला. देऊळवाडा येथील शेतकरी सुरेश आस्वले यांच्याशी संपर्क साधला असता, पाऊसामुळे देऊळवाडा शेत शिवारातील शेतकरी विठ्ठल आस्वले, मधूकर फोफरे, रमेश बावणे, ज्ञानेश्वर आस्वले, मारोती आस्वले, एकनाथ पारखी, तुळशीराम आस्वले, निळकंठ आस्वले, मधुकर कळसकर, रामचंद्र आस्वले, मधुकर पारखी , रमेश आस्वले आणि इतर अश्या एकूण वीस शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे नुकसान झाल्याचे समजते.प्राप्त माहिती वरून कळते की, रेल्वे प्रशासनाच्या वतीने भद्रावती - देऊळवाडा मार्गावर असलेल्या रेल्वे गेट जवळ रेल्वे पटरी खाली सुमारे दिड महिन्यापूर्वी बोगदा खोदून नवीन मार्ग तयार करण्याचे काम सुरु झाले. बोगदा खोदतांना बाहेर काढलेली माती रेल्वे पटरीच्या बाजूला टाकण्यात आली.
यामुळे पाऊसाचे पाणी वाहूण जाणारा नेहमीचा मार्ग पूर्णपणे बंद झाला. याचा विपरीत परीणाम म्हणून पाऊसाचे पाणी परीसरातील वीस शेतकऱ्यांच्या शेतात घुसले. शेतात पाणी घुसल्याने संबंधीत शेतकऱ्यांनी अलिकडेच लागवड करुन उगवन झालेल्या कपाशी, सोयाबीन व तुर पिकांचे नुकसान झाले. यात काही शेतकऱ्याचे भाजीपाला पिक सुध्दा नष्ट झाल्याचे समजते. सदर पाणी भद्रावती - देऊळवाडा मार्गावर सुध्दा पघरले होते.



**सध्या बोगदयाजवळ बेसुमार चिखल झाल्याने येथील नागरिकांना तीन किमीचा अतीरिक्त फेरा मारून ये - जा करावे लागत आहे. लागवड केलेले पिक नष्ट झाल्याने येथील शेतकरी चिंताग्रस्त झाले असून त्या सर्वांना शासन व प्रशासनाने नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रविंद्र शिंदे यांनी केली आहे.**

## वरोरा तालुक्यात नदी - नाल्यांना पूर



**वरोरा / प्रतिनिधी**
ओलीतासाठी धरणातील पाणी शेता पर्यंत आनता यावे म्हणून सिंचनासाठी कालव्याची निर्मीती केली जाते. या कालव्या देखभाल व दुरुस्ती करावी,व ज्यामुळे त्या कालव्यात कचरा,झाडे, झुडपे, होणार नाही, कालव्याला भेगा पडणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असते मात्र या कडे दुर्लक्ष केल्याने वारंवार कालवे फूटून शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप पुन्हा एकदा या निमित्ताने होताना दिसत आहे.
वरोरा तालुक्यातील खांबाडा परिसरात लभान सराड प्रकल्प आहे, तर लागुनच समुद्रपूर (जि वर्धा) तालुक्यात पोथरा प्रकल्प व लाल नाला प्रकल्पाचे पाणी ही वरोरा तालुक्यातील शेतांना सिंचनासाठी दिल्या जाते. दरवर्षी दिवाळी च्या अगोदर या कालव्या ची देखभाल व दुरुस्ती करावी लागते मात्र तसे होताना दिसत नाही केलीच तर थातुरमातुर पध्दतीने केल्या जाते त्यामुळे या कालव्यातून गवत,झाडे, झुडपे, निघताना दिसते त्यामुळे ठिकाणी पाणी जमा होऊन कॅनॉल ला भेगा पडतात आणि पाणी दुरवर जात नसल्याची ओरड नेहमीच होताना दिसते,
जुन महिन्यात पावसाळा सुरू होण्यापूर्वी कालव्यातील कचरा साफ करणे आवश्यक आहे आहे पण् तसे न केल्याने हा कालवा वारंवार फूटतो त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढला जावा अशी मागणी होताना दिसत आहे.
दि ८ जुलै( शुक्रवार) ला पहाटे ४.३० च्या सुमारास जोरदार पावसाची सुरुवात झाली अंदाजे ५ तास पाऊस पडला नदी नाले ओसंडून वाहू लागले, तालुक्यातील कोसरसार,
खाबांडा, खापरी, सह काही गावात पाणी घुसले कोसरसार ला आठवडी बाजारात बांधलेल्या बाजार ओटे पाण्याखाली बुडाले ग्रामपंचायत च्या जवळपास पाणी आले असल्याचे सांगितल्या जाते.
वरोरा तालुक्यातील खाबांडा नजीकच्या आर्वी (बारवा) येथील गावाजवळ चा कालवा फुटून पाणी शिरले होते सर्वत्र पाणीच पाणी झाले मात्र पाच तासांच्या नंतर पाऊस कमी झाला,
त्या सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला या घटनेची माहिती मिळताच वरोरा येथील तहसीलदार रोशन मकवाने, यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

## शाळा महाविद्यालयांमधून गणवेश आणि शैक्षणिक साहित्य विक्रीला शिवसेना जिल्हाप्रमुखांचा विरोध

### कारवाई करण्याची अधिकाऱ्यांकडे मागणी



**वरोरा / प्रतिनिधी**
शहर आणि तालुका परिसरातील काही शाळा व महाविद्यालय तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलीचे गणवेश , पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य त्याच शाळा व महाविद्यालयातर्फे चढ्या दारात विकले जात आहे. किंवा विशिष्ट दुकानातूनच खरेदी करण्याची अट घातली जात आहे. हा प्रकार म्हणजे पालकांची आर्थिक लूट असल्याने अशा शैक्षणिक संस्थावर कारवाई करावी अशी मागणी शिवसेना जिल्हा प्रमुख मुकेश जीवतोडे यांनी शुक्रवार दि ८ जुलै रोजी गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे निवेदनातून केली आहे.
वरोरा शहर आणि परिसरातील काही शैक्षणिक संस्थांनी शिक्षणाचे बाजारीकरण केले आहे.मोठी फी आकारणे,फी साठी विद्यार्थ्यांना त्रास देणे,विद्यार्थी व पालकांना अपमानास्पद वागणूक देणे हे प्रकार नित्याचेच झाले आहे. सोबतच शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य सुद्धा त्याच शाळेतून वाढीव दराने विकले जात आहे. किंवा विशिष्ट दुकानातूनच खरेदी करण्याची अट शाळा महाविद्यालया कडून घातली जात आहे. या माध्यमातून संबंधित शैक्षणिक संस्था नियमांचा भंग करून विद्यार्थी व पालकांची आर्थिक लूट करीत आहे. ज्ञानदानाचे एकमेव पवित्र कार्य करन्याचे काम असणाऱ्या अशा शैक्षणिक संस्थांनी या माध्यमातून जणू व्यवसायच सुरू केला असून त्याचा त्रास पालक आणि विद्यार्थ्यांना होत आहे.
यामुळे सदर सर्व शाळा महाविद्यालय व कनिष्ट महाविद्यालय यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे यांनी ज्ञानेश्वर चहारे प्रभारी गटशिक्षण अधिकारी, नामदेव राऊत शिक्षण विस्तार अधिकारी, सीमा राऊत शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती वरोरा यांचेकडे निवेदनातून केली आहे. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख चंद्रपूर मुकेश जीवतोडे, नगरसेवक दिनेश यादव, संदीप मेश्राम, जगदीश पंधरे, आलेख रट्टे, भूषन बुरीले, मनीष दोहतरे, हमुमान ठेंगने, वामन टोंगे उपस्थित होते. परिणामकारक कारवाई न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा मुकेश जीवतोडे यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिला आहे.

## मूल बस स्थानकाचे काम दोन महिन्यांत पूर्ण करा

### आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या अधिकाऱ्यांना सूचना
### चंद्रपूर , पोंभुर्णा बस स्थानकाच्या कामाचही घेतला आढावा






**मुंबई / प्रतिनिधी**
चंद्रपूर जिल्ह्यातील राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांच्या बांधकामास तात्काळ गती देवून मूल येथील बस स्थानक दोन महिन्यांत पूर्ण करा अशा स्पष्ट सूचना विधिमंडळ लोकलेखा समितीप्रमुख आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.
विधानभवन येथे यासंदर्भात आ. सुधीर मुनगंटीवार यांनी आढावा बैठक घेऊन चर्चा केली.
'एस.टी.' ही ग्रामीण प्रवाश्यांची रक्तवाहीनी आहे. प्रवासाकरीता सहज उपलब्ध होणारी व सोयीची ही व्यवस्था सर्वार्थाने बळकट व्हावी यासाठी सर्वांकश प्रयत्न करणार असून एस टी च्या प्रतिक्षेत असणाऱ्या प्रवाश्यांच्या सोयीकरीता असलेली बस स्थानके सर्व सोयी सुविधायुक्त व प्रशस्त असावित असे त्यांनी आवर्जून सांगितले.
स्वच्छ प्रसाधनगृह, उत्तम लाईट्स, पिण्यायोग्य पाणी आणि सुलभ बैठक व्यवस्था यांसह सर्व स्थानके उत्कृष्ठ व्हावीत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.
मूल आगाराकरीता मंजूर करण्यात आलेल्या १५० बसेस अद्याप का मिळाल्या नाहीत, दिनांक २४ डिसेंबर,२०२१ रोजी विधानसभा अधिवेशनात यासंदर्भात आ. मुनगंटीवार यांनी अर्धातास चर्चा उपस्थित केली, त्यावेळी मंत्र्यांनी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, कार्यवाही न झाल्याने आ. मुनगंटीवार यांनी या बैठकीत नाराजी व्यक्त करुन, यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याची सूचना केली.
चंद्रपूर, पोंभुर्णा येथील बस स्थानक देखील सुसज्ज व्हावे, बांधकामास वेग आणा असेही निक्षून सांगितले.
नागभीड बस स्थानकाच्या कामासंदर्भातदेखील त्यांनी माहिती घेतली.
या बैठकीस चंद्रपूरचे जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक (बांधकाम) भूषण देसाई, मुख्य स्थापत्य अभियंता वादिराज काळगी, परिवहन सहसचिव होळकर, वित्त सहसचिव विवेक दहिफळे, सारिका मेंढे आदी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार साप्ताहिक वृत्तपत्र मालक , प्रकाशक , संपादक आशीष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टिसव्हिसेस कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून मुद्रित करून मातृछायाभवन कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालयाअंतर्गत होईल.
A weekly newspaper `SAHYADRI CHARAKHANDAR` printed by *Suraj Bhaktraj Ghume*, sahyandri multiservices, karmveer ward , warora 442907 (M.H) on behalf of Ashish Maroti Ghume owner, publisher & Editor of sahyadri charakhandar` matruchaya bhawan` , karmveer ward warora 442907(M.H) . the editer may not be agree with the published content . in case any objection , the content will be redressed under warora court RNI NO : MAHMAR/2018/77866
CONTACT NUMBER :- Ashish Ghume 9011708840, Suraj Ghume 9673560360 EMAIL :- sahyandrinews@gmail.com EPAPER :- epaper.sahyandrinews.com